# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
## अर्थ प्रशासन विभाग

---

वाचा:— १. महाराष्ट्र शासन क्र. संकीर्ण १५१५/प्र.क्र.४४८/२०१५/६—ए दिनांक ३१/७/२०२३
२. कुलसचिव कार्यालय पत्र क्र. बीबीए/कृविके/डीसीपीएस/२०२१/२३७३ दिनांक ०८/०१/२०२१
३. विद्यापीठ आदेश क्र. बीबीए/कृविके/२०२३/१२१० जुलै २०२३
४. परिपत्रक क्र. अप्रवि/अंनिवेयो/२७०९/२०२३ दिनांक २४/०२/२०२३

अत्यंत महत्त्वाचे/कालमर्यादित/प्रथम प्राधान्य — जाक्रं/अप्रवि/अंसेनियो/87/२०२४ दिनांक: ०६/०५/२०२४

## परिपत्रक

या परिपत्रक व्दारे (सर्व) आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना कळविण्यात येते राज्य शासनातील अधिकारी/कर्मचारी यांना राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना लागू करण्यात आली आहे. तसेच राज्यातील चारही कृषि विद्यापीठांमध्ये या योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू झाली. नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेमध्ये समाविष्ट अधिकारी/कर्मचारी यांच्या वेतनामधून कपात करण्यात आलेल्या अंशदानाची गहाळ/प्रलंबित/खात्यामधील कमी रक्कमेची/जास्त रक्कमेची नोंदी अद्ययावत करण्यातबाबतचे परिपत्रक क्र. अप्रवि/अंनिवेयो/२७०९/२०२३ दिनांक २४/०२/२०२३ विद्यापीठ संकेतस्थळावर शेवटची संधी म्हणुन प्रसिध्द करण्यात आले होते.

सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांना सुचना देण्यात येते की, राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना विद्यापीठास लागू करण्यात आली आहे. विद्यापीठाअंतर्गत कार्यरत सर्व अधिकारी/कर्मचारी यांना नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना बन्द करण्यात आली आहेत. सभासदांचे व्याजासह अंशदान शासनाकडून राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेकडे ३१/०३/२०२३ पर्यंत संपुर्ण अंशदान वर्ग करण्यात आली आहेत नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेमध्ये समाविष्ट अधिकारी/कर्मचारी यांच्या वेतनामधून कपात करण्यात आलेल्या वर्ग अंशदानाची गहाळ/प्रलंबित/खात्यामधील कमी रक्कमेची/जास्त अंशदान असल्यास दिनांक २०/०५/२०२४ पर्यंत या कार्यालयात लेखीस्वरुपात विवरणपत्रासह कळविण्यात यावे जेणे करुन राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेचा अंशदान रक्कमेची नोंदी अद्ययावत करता येईल.

या अनुषंगाने सर्व कार्यालय प्रमुख/आहरण व संवितरण अधिकारी यांना सुचित करण्यात येते की, आपल्या अधिनिस्त कार्यरत अधिकारी कर्मचाऱ्यांचे राष्ट्रीय निवृत्ती वेतन खाते तपासुन ३१/०३/२०२३ पर्यंत वर्ग करण्यात आलेली अंशदान गहाळ/प्रलंबित/खात्यामधील कमी रक्कमेची/जास्त अंशदान असल्यास (कार्यालयातील मुळ कागदपत्रांवरून) तपासणी करावी तसेच एक्सेल शिट (सॉफ्ट कॉपी व हार्ड कॉपी) मध्ये संपुर्ण तपशिल तयार करुन दिनांक २०/०५/२०२४ पर्यंत अद्ययावत करण्याकरीता या कार्यालयात पाठविण्यात यावे.

नियंत्रक,
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,
अकोला.

प्रतिलीपी:—
१. नियंत्रण अधिकारी/विभाग प्रमुख/आहरण व संवितरण अधिकारी (सर्व).
३. मा. कुलगुरूंचे स्विय सहायक, मा. कुलगुरू डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांना माहितीकरिता सादर.
४. वेतन व लेखाधिकारी, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला / नागपूर यांना कळविण्यात येते की, वेतन देयक पारित झाल्यानंतर ८ दिवसाचे आत राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनाचे अंशदान धनादेश १० टक्के, १४ टक्के व विवरणपत्र या कार्यालयात सादर करावे.
५. प्रभारी अधिकारी, संगणक प्रणाली कक्ष,डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांना विद्यापीठाच्या संकेत स्थळावर प्रसारणाकरीता.

Officer In Charge, Agricultural Research System, Dr. P.D.K.V. Akola
Inward No. 53
Dt. 6/05/2024